दिः 11 मार्च,2014

# खासदार आणि आमदार यांच्या संदर्भात असलेल्या प्रकरणांच्या सुनावणीला वेग

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

सर्वोच्च न्यायालयाने एक एनजीओ "पब्लिक इन्टरेस्ट फाऊंडेशन"द्वारे दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर अंतरिम आदेश दिला आहे. यात सांगितले गेले आहे की खासदार आणि आमदार यांच्या विरोधात चालू असलेले भ्रष्टाचार आणि अन्य गंभीर गुन्ह्यांशी संबंधित असलेल्या ज्या प्रकरणात दोन वर्ष किंवा अधिक शिक्षेची तरतूद आहे, त्यात रोज वेगाने सुनावणी करताना याला आरोप सिद्ध होण्याच्या एक वर्षाच्या आत पूर्ण केले जावे. न्यायालयाने हे सुद्धा सांगितले की जर खटल्याची सुनावणी एक वर्षाच्या आत पूर्ण झाली नाही तर सुनावणी न्यायाधीशांनी संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याचे कारण सांगावे.

राजकारणातील अपराधिकरण भारतीय राजकारणासमोर एक गंभीर मुद्दा आहे. आजार हा आहे की राजकीय पक्ष अशा लोकांना निवडणुक मैदानात उतरवतात जे गुन्हे पार्श्वभुमीचे आहेत आणि ज्यांच्या विरोधात आरोप पत्र प्रलंबित आहेत. यामुळे देशाच्या जनतेच्या मनात राजकारणाची गुणवत्ता आणि संसदेत किंवा विधानसभेत प्रवेश करणा-या लोकांबद्दल शंका निर्माण होते. निवडणुक आयोग आणि कायदा आयोगाने साधारण सल्ला दिला आहे. त्यांचा तर्क आहे की, कोणतीही अशी व्यक्ती ज्याच्या विरोधात गुन्ह्याच्या काही विशिष्ट वर्गात आरोप स्पष्ट झाले आहेत तो उमेदवार बनण्याच्या योग्य नाही. तर संविधान आणि जन प्रतिनिधीत्त्व अधिनियम दोषी व्यक्तींना उमेदवार बनविण्यापासून रोखतो, अशा राजकारण्यांवर कोणताही प्रतिबंध लागू शकत नाही ज्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल झाले आहेत. यामुळे कायद्याची आवश्यकता आणि जनतेचे मत यांच्यादरम्यान संबंध तुटतो.

राजकीय पक्षाच्या अनेक बैठकीत या मुद्द्यावर चर्चा केली गेली आहे मात्र या प्रलंबित समस्येचे कोणतेही समाधान निघू शकले नाही. राजकीय पक्षांचा तर्क आहे की कायद्याच्या अंतर्गत कोणत्याही व्यक्तीला तोपर्यंत निरपराध मानले जाते जोपर्यंत त्याला दोषी ठरवले जात नाही. म्हणून कोणत्या अशा व्यक्तीला दोषी मानले जात नाही ज्याच्याविरोधात आरोपपत्र दाखल झाले आहेत. त्यांचा असा पण युक्तीवाद आहे की, कायदा आणि व्यवस्था राज्याचा विषय आहे आणि अनेक राज्यात बदल्याचे राजकारण असून राजकीय विरोधकांविरोधात खोटी प्रकरणे करणे मुश्किल काम नाही आहे. आरोप ठरवताना न्यायालय प्रथम दृष्ट्या सामग्री पाहतात.

एनडीए सरकार दरम्यान आम्ही मधल्या मार्गावर काम केले. एक विधेयक तयार केले ज्यात निर्घृण गुन्ह्याची एक श्रेणी बनविण्याचा प्रस्ताव ठेवला गेला. जर निर्घृण गुन्ह्याशी जोडलेल्या दोन प्रकरणात आरोप सिद्ध केले गेले तर ती व्यक्ती निवडणुक लढविण्यास अयोग्य घोषित केली जाईल. एनडीएचे समर्थन असलेला हा प्रस्ताव अन्य राजकीय पक्षांनी फेटाळला.

यानंतर काय समाधान आहे? काय व्यवस्था मूक गिळून गप्प बसेल. सर्वोच्च न्यायालयाने समाधान काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. समाधानात या सिद्धांताचा सन्मान केला गेला आहे की कोणतीही व्यक्ती तोपर्यंत निर्दोष आहे जोपर्यंत तिला दोषी ठरवत नाही. यात वाईट भावनेने प्रेरित आरोप पत्रांच्या विरोधात फिल्टर देण्यात आले आहे. यात त्या व्यक्तींवर बंदी नाही आहे ज्यांच्यावर फक्त आरोप आहेत. तसेच कोणताही राजकीय पुढारी, खासदार किंवा आमदार कायद्याचे उल्लंघन करणार नाही. त्यांच्याशी संबंधित प्रकरणांवर सुनावणी वेगाने आणि दररोज झाली पाहिजे. फक्त काही असाधारण कारणांना सोडून खटल्याची सुनावणी साधारणपणे एक वर्षाच्या आत पूर्ण झाली पाहिजे.

सर्वोच्च न्यायालायाच्या आदेशात या गोष्टीचे समर्थन केले गेले आहे की कोणतीही व्यक्ती तोपर्यंत निर्दोष समजले जाईल जोपर्यंत तिला दोषी ठरवले जात नाही. तसेच त्यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींना कठोर आणि तीव्र चौकशीसमोर ठेवले आहे. मी या आदेशाचे स्वागत करतो. हे चांगल्या दीशेने उचलण्यात आलेले पाऊल आहे.